**<u>साहसी क्रीडा प्रकारात विशेष उल्लेखनीय कामगिरी करणा-यांना प्रोत्साहनात्मक आर्थिक मदत करणे:</u>**

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील साहसी खेळ प्रकारात राज्य,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विशेष उल्लेखनिय कामगिरी करुन नवी मुंबई शहराचे नाव लौकीक केले असल्यास अशा व्यक्तींना प्रोत्साहनात्मक आर्थिक मदत करणे आवश्यक आहे. ज्यामुळे त्यांना प्रोत्साहन मिळून अधिक उत्कृष्ट कार्य करता येईल. त्यामुळे अशा स्वरुपाची क्रीडा व तत्सम क्षेत्रात विशेष उल्लेखनिय कामगिरी करणा-या व्यक्तींकरीता शासन परिपत्रक क्रं.जीईन1098/प्र.क्र.-21/98/नवि-24, दि.09 मार्च 1998 मधील तरतुदीनुसार शुक्रवार दि.24 ऑगस्ट 2018 रोजीच्या भरलेल्या सर्व साधारण तहकूब सभेमध्ये सहासी खेळप्रकाराकरीता विशेष प्रोत्साहन म्हणुन आर्थिक मदत करण्यास मंजुरी मिळालेली आहे.

**<u>साहस</u> : एखादया व्यक्तीने जल, स्थल व आकाश या ठिकाणी प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन तसेच त्याच्या जिवितास असणा-या धोक्याची जाणीव असुनही परिपुर्ण केलेली कामगिरी म्हणजे साहस होय.**

- ❖ साहसी क्रीडा प्रकारामध्ये 1) खाडी/समुद्र पोहणे 2) गिर्यारोहण 3) सायकलीवर जगप्रवास करणे 4)शिडाच्या होडीतून समुद्र प्रवास करणे 5) पॅराग्लायडिंग/पॅराजंपिंग प्रकाराकरीता प्रथम टप्प्यातील त्यांची कामगिरी विचारात घेऊन पुढील कामगिरीकरीता विशेष प्रोत्साहन म्हणून एका ठिकाणाकरीता एकदाच तसेच वर्षातुन एका वेळेस याप्रमाणे खालील नुसार अर्थ सहाय्य देय राहील.

1) साहसी प्रकारामधील खाडी/समुद्र पोहणे - जागतिक ओपन वाटर स्विमिंग असोसिएशन यांनी निर्धारित केलेले जागतिक मान्यता प्राप्त मानांकित असे 7 समुद्र /खाडी पोहण्यासाठी एका ठिकाणाकरीता एकदाच तसेच वर्षातुन एका वेळेस प्रोत्साहन म्हणून रक्कम रु.40,000/- इतकी आर्थिक सहाय्य देय राहील.
2) देशांतर्गत किमान 21 कि.मी. पेक्षा अधिक अंतराचे समुद्र /खाडी पोहण्यासाठी एका ठिकाणाकरीता एकदाच तसेच वर्षातुन एका वेळेस प्रोत्साहन म्हणून त्याचबरोबर साहसी जलतरण स्पर्धेत भारतीय जलतरण महासंघाव्दारे आयोजित/पुरस्कृत करण्यात येणा-या 14 कि.मी. पेक्षा अधिक अंतर असलेल्या अखिल भारतीय सागरी जलतरण स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या (प्रथम तीन क्रमांकास) खेळाडूंस रक्कम रु.20,000/- इतकी आर्थिक सहाय्य देय राहील.
3) गिर्यारोहण- अतिउंचावरील शिखरावंर गिर्यारोहणाचे तांत्रिक कौशल्य आणि सुरक्षा साधानांचा वापर करुन केलेले आरोहण. यामध्ये जगातील मानांकित अशा शिखराची चढाई करणा-यांस साहसी क्रीडा प्रकारातील वैशिष्यपूर्ण कामगिरी बद्दल रक्कम रु.40,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.
4) देशांतर्गत गिर्यारोहण करणा-यांस साहसी प्रकारातील वैशिष्ठपूर्ण कामगिरी बद्दल रु.20,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.

5) सायकलवर जगप्रवास करणे या साहसी प्रकारात वैशिष्ठपूर्ण कामगिरी करुन नवी मुंबई शहराचे नाव लौकीक केल्यास त्याबद्दल रु.40,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.
6) सायकलवर देश प्रवास देशांतर्गत सायकलव्दारे पुर्व,पश्चिम,दक्षिण,उत्तर व मध्य या विभागातील राज्यांमधुन प्रवास करुन सामाजिक बांधिलकी जपणे,समाज विकासाच्या दृष्टीने संदेश घेऊन प्रबोधनात्मक काम केले असल्यास ज्यामुळे नवी मुंबई शहराचे नाव लौकीक केले असल्यास त्याबद्दल रु.20,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.
7) शिडाच्या होडीतून समुद्र प्रवास करणे- या साहसी प्रकारामध्ये एकाच व्यक्तीने जगभरातील समुद्रपर्यटन कोणत्याही थांब्याशिवाय,थांब्यासह, किंवा क्रु सोबत कोणत्याही थांब्याशिवाय, क्रु सोबत थांब्यासह प्रवास करुन नवी मुंबई शहराचे नाव लौकीक केले असल्यास त्याबद्दल रु.40,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.
8) पॅराग्लायडिंग/पॅराजंपिंग- राष्ट्रीय पातळीवर एअरो क्लब ऑफ इंडिया यांनी निश्चित केलेल्या निकषांनुसार आयोजित केलेल्या पॅराग्लायडिंग/पॅराजंपिंग हवाई साहसी प्रकारात सहभागी होऊन नवी मुंबई शहराचे नाव लौकीक केले असल्यास त्याबद्दल रु.40,000/- इतकी रक्कम प्रोत्साहन म्हणून आर्थिक सहाय्य देय राहील.